दैनिक
E-Mail:dainikmhavratt@gmail.com
# महावृत्त
संपादक-अशोक हनवते.मो-9421094991,7264079990




लातूर वर्ष ५ वे अंक ३१ शुक्रवार दि.०१ ऑगस्ट २०२५ पृष्ठे ४ स्वागत मूल्य २ रू.

## चाळीसगावमध्ये २५ हजारांची लाच घेताना महिला तलाठीसह तिघे जाळ्यात



धुळे : चाळीसगाव तालुक्यातील पाथरजे येथील वडिलोपार्जित शेतजमिनीवरील जुन्या कालबाह्य नोंदी ७/१२ उताऱ्यावरून कमी करण्यासाठी २५ हजार रुपयांची लाच मागितल्याचा प्रकार उघडकीस आला आहे. धुळे लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने (एसीबी) गुरुवारी सायंकाळी चाळीसगाव तहसील कार्यालयाबाहेर सापळा रचून महिला तलाठी मोमीन दिलशाद अब्दुल रहिम, रोजगार सेवक वाडीलाल रोहिदास पवार आणि दादा बाबू जाधव यांना रंगेहात पकडले.

तक्रारदार यांच्या वडिलांच्या नावावर असलेल्या शेतजमिनीवरील जुनी नजर गहाण नोंद कमी करण्यासाठी अर्ज करण्यात आला होता. या अर्जावर कार्यवाही करण्यासाठी तलाठी मोमीन यांनी तक्रारदार यांना तुमचे काम मोठे आहे, मी वाडीलाल पवार यांच्याशी बोलते, त्यांना भेटा, असे सांगितले. तक्रारदारांनी रोजगार सेवक वाडीलाल पवार यांची भेट घेतली असता, त्यांनी तलाठी मोमीन यांच्या सांगण्यानुसार २५ हजार रुपये लाच मागितली. मोमीन मॅडम यांनी सांगितले आहे, पैसे दिल्याशिवाय काम होणार नाही, असे वाडीलाल पवार यांनी स्पष्ट केले.

तक्रारदाराने धुळे लाचलुचपत प्रतिबंधक विभागाकडे तक्रार दिल्यानंतर, ३० रोजी सायंकाळी सापळा रचण्यात आला. तक्रारदाराकडून २५ हजार रुपये घेतल्यानंतर, रोजगार सेवक वाडीलाल पवार हे पैसे तलाठी मोमीन यांना देण्यासाठी जात असताना, एसीबीच्या पथकाने त्यांना रंगेहात पकडले. या प्रकरणात तिघांविरुद्ध चाळीसगाव शहर पोलीस ठाण्यात भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियमांतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

ही कारवाई नाशिक लाचलुचपत प्रतिबंधक विभागाचे पोलीस अधीक्षक भारत तांगडे, अपर पोलीस अधीक्षक माधव रेड्डी यांच्या मार्गदर्शनाखाली, धुळे विभागाचे पोलीस उपअधीक्षक सचिन साळुंखे आणि त्यांच्या पथकाने केली. या यशस्वी कारवाईमुळे महसूल विभागातील भ्रष्टाचारावर मोठा आघात झाला आहे.

## किरण गित्ते कनिष्ठ महाविद्यालयाचा विद्यार्थी यांनी जिल्हास्तरीय योगासन स्पोर्ट चॅम्पियनशिप स्पर्धेमध्ये पटकवला तिसरा क्रमांक

परळी वैजनाथ (प्रतिनिधी) :- कै. रामभाऊ आणा खाडे सेवाभावी संस्था संचलित पुस येथील किरण गित्ते कनिष्ठ महाविद्यालयाचा विद्यार्थी समर्थ धोकटे यांनी बीड जिल्हास्तरीय योगासन स्पोर्ट चॅम्पियनशिप स्पर्धेमध्ये तिसरा क्रमांक पटकवल आहे. समर्थ धोकटे यांचे सर्व स्तरातून अभिनंदन करीत पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.




महाराष्ट्र योगासन स्पोर्ट्स असोसिएशन आणि बीड जिल्हा योगासन स्पोर्ट्स असोसिएशन यांच्या संयुक्त विद्यमाने बीड जिल्हास्तरीय योगासन स्पोर्ट चॅम्पियनशिप स्पर्धे मोठ्या उत्साहात घेण्यात आल्या. योगासन स्पर्धेत ग्रामीण, शहरी विद्यार्थी आणि युवकांचा सहभाग वाढावा, खेलो इंडिया, ऑलिम्पिक साठी खेळाडू तयार व्हावेत, तसेच सर्वत्र मानसिक व शारीरिक तंदुरुस्तीसाठी योगाचा प्रचार व्हावा यासाठी या स्पर्धा घेतल्या जातात. नुकत्याच पार पडलेल्या बीड जिल्हास्तरीय योगासन स्पोर्ट चॅम्पियनशिप स्पर्धे मध्ये कै. रामभाऊ आणा खाडे सेवाभावी संस्था संचलित पुस येथील किरण गित्ते कनिष्ठ महाविद्यालयाचा विद्यार्थी समर्थ धोकटे यांनी बीड जिल्हास्तरीय योगासन स्पोर्ट चॅम्पियनशिप स्पर्धेमध्ये तिसरा क्रमांक पटकवल आहे. त्यांच्या यशाबद्दल कै. रामभाऊ आणा खाडे सेवाभावी संस्था अध्यक्ष तथा नाथ शिक्षण संस्थेचे सहसचिव प्रदीप खाडे व किरण गित्ते कनिष्ठ महाविद्यालयातील सर्वांनी अभिनंदन करून पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या आहेत.

## यापुढे पाकिस्तान भारताला इंधन पुरविणार

वॉशिंग्टन : पाकिस्तान लवकरच भारताला पेट्रोल-डिझेल, इंधनाचा पुरवठा करू शकतो, असा दावा अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी केला. जवळचा मित्र म्हणवणा-या ट्रम्प यांनीच मोदी सरकारला डिवचले आहे. ट्रम्प यांना खरंच पाकिस्तानचा पुळका आलाय की भारतावर दबावतंत्राचा हा प्रयोग आहे, याची चर्चा आता रंगली आहे. मोदी सरकारने गेल्या तीन वर्षांपासून इंधन खरेदीत रशियाला झुकते माप दिले आहे. अमेरिकेच्या दादागिरीला भीक न घातल्यानेच ट्रम्प अशी खेळी खेळत असल्याचे बोलले जात आहे.

भारतावर अमेरिकेने २५ टक्के टॅरिफ आणि इतर भारीभक्कम शुल्क लादण्याची घोषणा ट्रम्प यांनी काही तासांपूर्वी केली. त्यानंतर लागलीच त्यांनी पाकिस्तानसोबत व्यापारी कराराची इत्यंभूत माहिती दिली. या करारात प्रामुख्याने एका गोष्टीचा उल्लेख ट्रम्प यांनी केला. पाकिस्तानातील तेलसाठ्यांचा शोध आणि उत्पादन करण्यासाठी संयुक्त प्रयत्न करणार असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. इतक्यावर थांबतील ते ट्रम्प कसले? त्यांनी आपण मुत्सद्देगिरीत आणि रणनीतीत कसलेले आहोत, हे दाखवण्यासाठी मोदी सरकारला डिवचले.

या कराराचे फलित काय होईल हे सांगताना, भारतासाठी पाकिस्तान हा भविष्यातील तेलाचा संभाव्य स्त्रोत असेल, असे अप्पलपोटी वक्तव्य केले. ट्रम्प यांनी समाज माध्यमा वर त्याविषयीचे मुद्दे मांडले आहे. वॉशिंग्टन आणि इस्लामाबादमधील या खलबतांची त्यांनी जगाला माहिती करून दिली. भारतावर हा दबावतंत्राचा प्रयोग आहे असे मानण्यात येत आहे.

पाकिस्तान विकेल भारताला इंधन

आम्ही आताच पाकिस्तानसोबतचा व्यापारी करार पूर्ण केला. त्यानुसार, पाकिस्तान आणि संयुक्त अमेरिका हे दोन्ही देश मोठ्या प्रमाणात तेलसाठ्यांचा शोध आणि त्याचे उत्पादन करू. दोन्ही देशांनी एक कंपनी या सर्व प्रक्रियेसाठी निश्चित केली आहे. कुणाला माहिती काही दिवसांनी ही कंपनी भारताला सुद्धा इंधन विक्री करेल. डोनाल्ड ट्रम्प यांच्या या ट्विटने पाकिस्तानमध्ये आनंदाच्या उकळ्या फुटल्या असतीलही पण त्यांना भारतीय परराष्ट्र नीतीचा राग आलाय हे निश्चित मानण्यात येत आहे.

## नवजात बाळांच्या स्वागतासाठी आगळीवेगळी संकल्पना; 'इंडिया मीडिया लिंक अँड इव्हेंट्स' कडून पर्यावरण रक्षणाचा संदेश

मुंबई /प्रतिनिधी: इंडिया मीडिया लिंक अँड इव्हेंट्स मॅनेजमेंटच्या वतीने नागपाडा येथील जे. जे. वैद्यकीय अधीक्षक कार्यालय, हॉस्पिटल मोहम्मद अली रोड येथे नवजात बाळांचे आणि त्यांच्या पालकांचे स्वागत करण्यासाठी एक आगळीवेगळी आणि नाविन्यपूर्ण संकल्पना राबवण्यात आली. या उपक्रमाअंतर्गत नवजात बाळांना आणि त्यांच्या पालकांना एक झाड, टॉवेल, टोपी आणि मिठाई यांचा समावेश असलेले खास बाळाचे स्वागत किट देण्यात आले.या उपक्रमात प्रत्येक नवजात बाळाला हरित शुभेच्छा देत त्यांच्या आयुष्याची सुरुवात एका झाडासोबत जोडली गेली. 'एक बाळ - एक झाड' ही कल्पना प्रत्यक्षात आणत समाजात पर्यावरण जागृती आणि नैसर्गिक संसाधनांचे जतन या उद्दिष्टाने हे पाऊल उचलण्यात आले.

कार्यक्रमावेळी इंडिया मीडिया लिंक अँड इव्हेंट्स मॅनेजमेंटचे संयोजक के. रवि दादा, मंत्रालयाचे सहसचिव अशोक अत्राम, अभिनेते अली खान, कमल खान, राज्याचे माजी सहसचिव प्रीतम आठवले, समाजसेविका संगीता भाटिया आणि परब यांच्यासह इतर मान्यवर उपस्थित होते. यावेळी के. रवि दादा यांनी पर्यावरण विषयावर मार्मिक भाष्य करत सांगितले की,आपल्या आजूबाजूचं पर्यावरण दिवसेंदिवस धोक्यात येत आहे. देशातील शास्त्रज्ञ वारंवार या संकटाबद्दल इशारे देत आहेत. तरीही झपाट्याने वाढणाऱ्या नागरीकरणामुळे झाडांची बेसुमार तोड सुरू आहे. विशेषतः मुंबईसारख्या शहरांमध्ये झाडं तोडून मोठमोठ्या इमारती उभ्या राहत आहेत. शहराचा विकास गरजेचा असला तरी त्याबरोबर निसर्गाचं नुकसान भविष्यात गंभीर परिणाम घडवू शकतं. वृक्षतोडीमुळे तापमान वाढतं, हवामान असंतुलित होतं, आणि पावसाचे प्रमाण बदलतं - या सर्व गोष्टी भविष्यातील आपत्तींचं कारण बनू शकतात. म्हणूनच प्रत्येकाने झाडं लावण्याचा, त्यांचे संगोपन करण्याचा आणि पर्यावरणाचं रक्षण करण्याचा संकल्प केला पाहिजे. हे आपलं सामाजिक कर्तव्य आहे, असे ते म्हणाले. या अभिनव उपक्रमाने फक्त बाळांचं स्वागतच केलं नाही, तर पर्यावरण रक्षणाचा एक महत्त्वाचा संदेशही दिला. 'एक बाळ - एक झाड' ही संकल्पना भविष्यातील जनगणनेत आणि आरोग्य सेवा उपक्रमांमध्ये देखील समाविष्ट केली जाऊ शकते, असा विश्वास आयोजकांनी व्यक्त केला. या कार्यक्रमामुळे सामाजिक कार्य आणि पर्यावरण रक्षण यांचा संगम साधणाऱ्या कार्यक्रमांचे महत्त्व अधोरेखित झाले. नवजात बाळांसाठी झाडाचं रोप हे फक्त एक भेटवस्तू नव्हे, तर भविष्यातील शुद्ध हवेसाठीचा आणि हिरवळीसाठीचा आश्वासक आरंभ आहे.असे सिने अभिनेते अली खान यांनी सांगितले. कार्यक्रमात 'झाड लावा, झाड वाचवा' हा संदेश देत नवजात बाळांच्या स्वागताचा उपक्रम एक सामाजिक व पर्यावरणीय भान जपणारा प्रेरणादायी पाऊल ठरला.






## थंडी तापाकडे दुर्लक्ष केल्यास किडनीचे दुखणे

मुंबई : सुरुवातीच्या टप्प्यातील किडनीच्या आजाराने पीडित व्यक्ती ब-याचदा पूर्णपणे निरोगी वाटतात आणि म्हणूनच आपल्याला लसीकरणाची गरज नाही असे त्यांना वाटते. वैज्ञानिक पुराव्यांनुसार की किडनीच्या सौम्य आजारामुळेही रुग्णांना संसर्ग, विषाणूशी संबंधित कर्करोग आणि लसीला मिळणारा प्रतिसाद कमी होण्याचा धोका वाढतो.

पावसाळ्यात जेव्हा संसर्गाचे प्रमाण वाढते तेव्हा हे अधिक चिंताजनक ठरते. मुंबईच्या झेन मल्टी स्पेशालिटी हॉस्पिटलचे वरिष्ठ नेफ्रोलॉजिस्ट डॉ. विश्वनाथ बिल्ला, यांनी किडनीच्या विकाराने पिडित व्यक्तींसाठी लसीकरणाची भूमिका किती महत्त्वाची आहे ?रोगप्रतिकारक शक्ती आणि किडनीचे आजार तसेच त्यावरील प्रतिबंधात्मक उपाय काय असावेत याविषयी काही टिप्स दिल्या आहेत. मूत्रपिंड (किडनी) हा आपल्या शरीरातील एक महत्त्वपूर्ण अवयव आहे.

मूत्रपिंड तुमच्या रक्तातील टाकाऊ पदार्थ आणि अतिरिक्त द्रव बाहेर काढून टाकण्यास मदत करतात. संशोधनातून असे दिसून आले आहे की दीर्घकालीन किडनीचा बिघाड असलेल्या रुग्णांमध्ये होणा-या एकूण मृत्यूंपैकी ७०% मृत्यू हे हृदयरोग आणि संसर्गामुळे होतात. सीकेडी (क्रोनिक किडनी डिसीज) रुग्णांमध्ये टी सेल्स म्हणजेच जे रोगप्रतिकारक प्रतिक्रियांचे नियमन करते आणि अति प्रतिक्रिया टाळते. स्वतःच्या शरीराच्या पेशींवर हल्ला होऊ देत नाही आणि ऑटोइम्यून प्रतिक्रिया नियंत्रित ठेवते अशा पेशी आणि बी सेल्स म्हणजेच बी लिम्फोसाइट्स ॲन्टीबॉडीज तयार करतात, जे आपल्या शरीराला विशिष्ट प्रतिजनांशी लढण्यास मदत करतात अशा दोन्ही पेशींचे प्रमाण कमी होते. मूत्रपिंडाच्या आजारात रोगप्रतिकारक शक्ती कमकुवत झाल्यामुळे मूत्रपिंडाचे गंभीर नुकसान होते.पावसाळ्यात वाढतोय संसर्गाचा धोका

पावसाळ्याच्या काळात, वाढलेली आर्द्रता, दूषित पाण्याचे स्त्रोत आणि रोग वाहक अशा डासांच्या प्रसारामुळे संसर्ग पसरण्यासाठी अनुकुल परिस्थिती निर्माण होते. प्रमुख भारतीय शहरांमधील अभ्यासातून असे दिसून आले आहे की पावसाळ्यात तीव्र तापाच्या आजाराने ग्रस्त असलेल्या १३.२१% रुग्णांना तीव्र मूत्रपिंड दुखापत झाली आहे.

## प्रबोधन रॅलीमध्ये सहभागी होण्याचे जाहीर अवाहन

लातूर शहरातील सर्व परिवर्तनवादी संस्था,संघटना, पक्ष आणि व्यक्तीना विनंती करण्यात येते की, ' ऋ- २४ डर्ीीी ' या सामाजिक संघटने अंतर्गत स्थापन झालेल्या साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे जयंती समितीच्या पुढाकाराने दि. १ ऑगष्ट २ज२५ रोजी सकाळी ठिक ८:३ज वाजता बहुजनांचे नायक साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे यांच्या १ज५ व्या जयंती निमीत्त लातूर शहर प्रबोधन रॅलीचे आयोजन करण्यात आले आहे.

सदर रॅली सकाळी ठीक ८ : ३ज वाजता डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्याला पुष्पाहार अर्पण करून मुख्य रस्त्याने गंजगोलाई मार्गे अण्णाभाऊंच्या पुतळ्याजवळ ठिक ९:३ज वाजता पोहचेल.

तरी कृपया सर्वांनी आपल्या संस्था ,संघटना , पक्षा चे बॅनर घेऊन कार्यकर्त्यश्रसह या रॅलीत सहभागी व्हावे. ही विनंती.

### आपले विनीत

--------------------

राजकुमार होळीकर ( अध्यक्ष ) पांडूरंग देडे ( सचिव ) अफजल कुरेशी ( कार्याध्यक्ष ) ॲड. सोमेश्वर वाघमारे (कोषाध्यक्ष ) डॉ. गणेश गोमारे ( सहसचिव ) मोहन कांबळे सेलूकर ( सहकोषाध्यक्ष ) शिरीष दिवेकर, बालाजी साबळे,बरकत काझी, डॉ.बी.आर.पाटील, ( सर्व उपाध्यक्ष ) श्रीमती महानंदा शेवाळे, श्रीमती सुधाताई कांबळे (महिला प्रतिनिधी ) रामराजे आत्राम, यु.डी. गायकवाड ( निमंत्रक ) प्राचार्य सोमनाथ रोडे, प्राचार्य नागोराव कुंभार, प्रा.हर्षवर्धन कोल्हापूरे, प्रा.सुभाष भिंगे, प्रा. अशोक नारनवरे, प्रा. निशिकांत वारभूवन, नरसिंग घोडके, प्रा.सुधीर अनवले , कॉ. विश्वंभर भोसले ( सर्व सल्लागार ) गणपत तेलंगे, शिवाजी गायकवाड, प्रा. वैभव सरवदे, शिवाजी नरहर, राजकुमार नामवाड ( सर्व सदस्य ) ' ऋ- २४ डर्ीीी ' प्रणित साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे जयंती समिती , लातूर २ज२५

# संपादकीय

## लोकशाहीच्या उंबरठ्यावर सीरिया

दोन दशकांहून अधिक काळ सीरियावर हुकूमशाही गाजवणारे बशर अल-असद यांची रक्तरंजित हुकूमशाही राजवट आता इतिहासजमा झाली आहे. एका क्रूर आणि विनाशकारी अध्यायानंतर, सीरिया आता एका नव्या पर्वाच्या उंबरठ्यावर उभा असून, या देशात लोकशाहीच्या दिशेने पहिले महत्त्वाचे पाऊल म्हणून सप्टेंबर २०२५ मध्ये पहिल्या संसदीय निवडणुका होणार आहेत. असद राजवटीच्या पतनानंतर, हा देश स्थैर्य आणि नवसंकल्पनांच्या दिशेने वाटचाल करण्याचा प्रयत्न करत आहे.

खरे तर सीरियावर दीर्घकाळ हुकूमशाही राजवट चालवणार्‍या असद यांची कारकिर्दीच्या सुरुवातीस राजकारणात येण्याची कोणतीही इच्छा नव्हती. ते लंडनमध्ये नेत्रचिकित्सक म्हणून कार्यरत होते. मात्र, १९९४ मध्ये त्यांचे मोठे बंधू बासेल अल-असद यांचा अकाली मृत्यू झाल्याने, त्यांचे वडील आणि तत्कालीन राष्ट्राध्यक्ष हाफेझ अल-असद यांनी बशर यांना वारस म्हणून निवडले. वडिलांच्या निधनानंतर २००० मध्ये, सीरियाच्या संविधानात बदल करून राष्ट्राध्यक्षपदासाठी वयोमर्यादा कमी केली आणि बशर अल-असद यांनी सत्ता हाती घेतली. सुरुवातीला त्यांच्याकडून काही सुधारणांची अपेक्षा होती, ज्याला 'दमास्कस स्प्रिंग' असे म्हटले गेले. काही प्रमाणात माध्यमांना मुभा मिळाली आणि राजकीय कैद्यांची सुटकाही झाली; पण ही आशा लवकरच मावळली.

लवकरच असद यांची राजवट कठोर आणि दडपशाही करणारी ठरली. त्यांनी वडिलांपेक्षाही अधिक क्रूरपणे राजकीय विरोधकांना चिरडले. २०११ मध्ये 'अरब स्प्रिंग' या चळवळीच्या प्रभावाने सीरियात लोकशाहीच्या मागणीसाठी शांततापूर्ण निदर्शने सुरू झाली. असद सरकारने या निदर्शनांना अमानुषपणे चिरडून टाकले, ज्यामुळे देश भीषण गृहयुद्धाच्या खाईत ढकलला गेला. या युद्धात त्यांच्या राजवटीवर रासायनिक हल्ले, बॅरल बॉम्बचा वापर आणि नागरिकांवर अमानुष अत्याचार केल्याचे गंभीर आरोप झाले. रशिया आणि इराणच्या लष्करी मदतीमुळे ते दीर्घकाळ सत्तेवर टिकून राहिले. लाखो लोक विस्थापित झाले आणि हजारो मारले गेले, ज्यामुळे सीरिया हा विध्वंसाचे प्रतीक बनला.

अखेरीस, जवळपास १३ वर्षांच्या विध्वंसक गृहयुद्धानंतर, ८ डिसेंबर २०२४ रोजी बंडखोर गटांनी, विशेषतः 'हयात तहरीर अल-शाम' (एचटीएस) च्या नेतृत्वाखाली, दमास्कसवर ताबा मिळवला. असद हे कुटुंबासह सीरिया सोडून रशियाला पळून गेले, ज्यामुळे त्यांची क्रूर हुकूमशाही राजवट अखेर संपुष्टात आली. आता असदविहीन सीरिया एक नवीन अध्याय सुरू करत आहे. सप्टेंबर १५ ते २० दरम्यान होणार्‍या संसदीय निवडणुका हे त्याचे पहिले पाऊल आहे. यात २१० संसदीय जागांसाठी मतदान होईल, ज्यापैकी दोन तृतीयांश जागा निवडल्या जातील, तर एक तृतीयांश जागा हंगामी राष्ट्राध्यक्ष अहमद अल-शारा नियुक्त करतील. स्त्रियांचा २० टक्के सहभाग आणि 'युद्ध गुन्हेगार' किंवा सांप्रदायिकतेला प्रोत्साहन देणार्‍या उमेदवारांना अपात्र ठरवण्याचे नियम हे एका नवीन, अधिक जबाबदार प्रशासनाचे संकेत देत आहेत.

# कृषी की उद्योग?

भारताला केवळ एकाच क्षेत्राचा विकास किंवा विस्तार करून चालणार नाही तर सर्वसमावेशक विकासाची संकल्पना अस्तित्वात आणावी लागेल. भारत हा कृषिप्रधान देश असून देशाचे अर्थचक्र बहुतांशपणे याच क्षेत्रावर अवलंबून आहे. अर्थात, मनुष्यबळ आणि जमिनीची उपलब्धता या आधारावर कृषी क्षेत्राचा विकास अवलंबून असल्याने भारताला अजूनही युरोपीय, अमेरिकेप्रमाणे कृषी क्षेत्रात आघाडी घेता आलेली नाही. अलीकडच्या काळात आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर वाढत असला तरी त्याचा वेग संथच आहे. म्हणूनच सर्वस्तरावर व्यापक प्रमाणात सामूहिक प्रयत्नातून कृषी आणि औद्योगिक क्षेत्राची सांगड घालावी लागेल तरच भारत विकसनशील श्रेणीतून बाहेर पडेल.



भारतासह अनेक देशांच्या अर्थव्यवस्थेत कृषी क्षेत्राला अनेक काळापासून अर्थव्यवस्थेचा कणा मानले गेले आहे. भारत, ब्राझील, इंडोनेशियासाखे देश कृषीच्या माध्यमातून केवळ अन्नसुरक्षा निश्चित करत नसून मोठ्या प्रमाणात रोजगार निर्मिती देखील करतात. भारतात सुमारे ६० टक्के लोकसंख्या ही आजही प्रत्यक्ष आणि अप्रत्यक्ष रुपाने कृषी क्षेत्रावर अवलंबून आहे. स्वातंत्र्यानंतर हरित क्रांती, धवल क्रांती, नील क्रांती यासारख्या प्रयत्नांतून कृषी क्षेत्रात सुधारणा झाल्या आहेत. या माध्यामतून शेतकर्‍यांच्या उत्पन्नात काही प्रमाणात वाढ झाली आहे. मात्र कृषी आधारित विकास भारताला जागतिक आर्थिक महासत्तेच्या पदापर्यंत पोचवेल का? हा प्रश्न आहे.

प्रत्यक्षात शेती आणि शेतकर्‍यांची भूमिका ही सामाजिक आणि राजकीय दृष्टिकोनातून महत्त्वाची असली तरी आर्थिकदृष्ट्या ती संकुचित होत आहे. कृषी क्षेत्राचा सकल देशांर्तगत उत्पादनातील (जीडीपी) वाटा घसरत आहे. २००० मध्ये भारताच्या जीडीपीत कृषी क्षेत्राचे योगदान २१.६ टक्के होते आणि ते २०21 मध्ये कमी होत १६.८ टक्के राहिले आहे. यात घसरण नोंदवूनही भारत जगातील आघाडीच्या कृषी उत्पादक देशांत सामील आहे. यामागचे कारण म्हणजे कृषी उत्पादनातील तंत्रज्ञानात सुधारणा होय. यात प्रामुख्याने मशिनरी, उच्च प्रतींची बियाणे, सिंचन प्रणालीचा वाढता वापर या कारणांमुळे कृषी क्षेत्रात बदल झाले आहेत. मात्र विकासाच्या पुढच्या टप्प्यांचा विचार केला तर या गोष्टी औद्योगिक आणि सेवा क्षेत्राच्या विस्तारातूनच साध्य होणार्‍या आहेत.

जागतिक पातळीवरचा अनुभव पाहिल्यास अमेरिका, कॅनडा, चीन, ब्राझील आणि रशियासारख्या देशांनी औद्योगिक विकासाला प्राधान्य देऊनच आर्थिक महाशक्तीचा दर्जा मिळवला आहे. या देशांत कृषी क्षेत्राचा जीडीपीतील वाटा आजही दोन टक्क्यांपेक्षा कमी आहे. मात्र उत्पादकतेचे प्रमाण लक्षणीय आहे. कारण त्यांनी देशाच्या सर्वंकष उत्पादनात सातत्यपूर्ण सुधारणा केल्या आहेत. भारतातील राज्यांचा विचार केल्यास पंजाब, हरियाणा, महाराष्ट्र, कर्नाटक, पश्चिम बंगालसारख्या राज्यांनी कृषीबरोबरच औद्योगिक आधारदेखील मजबूत केला आहे. उदाहरणार्थ, महाराष्ट्र आणि कर्नाटकात कृषी आधारित उद्योगांचा वेगाने विकास झाला असून त्यामुळे ग्रामीण क्षेत्रातील उत्पन्न आणि रोजगारात वाढ झाली आहे. याउलट उत्तर प्रदेश आणि बिहारसारख्या राज्यात कृषी क्षेत्रावर अधिक अवलंबित्व असल्याने आर्थिक विकासाचा वेग हा संथच आहे. कारण या राज्यातील उद्योगाचा आधार तुलनेने कमकुवत आहे.

कृषी सुधारणांसह वेगाने आणि सर्वसमावेशक औद्योगिकीकरणाची गरज आहे. आपल्याला लहान आणि मध्यम कृषी आधारित उद्योग, ग्रामीण प्रक्रिया केंद्र आणि तंत्रज्ञान आधारित उत्पादनातील गुंतवणुकीला प्राधान्य द्यावे लागेल. एका अहवालानुसार, जागतिक कृषी उत्पादन १९६० पासून ते २०२२ या दरम्यान वार्षिक १.९२ टक्के दराने वाढल्याची नोंद झाली आहे. यातील ५१ टक्के वाढ ही टीएङ्गपी म्हणजेच कृषी स्रोतातून झाली आहे. ब्राझील आणि भारतासारख्या देशांत कृषी क्षेत्रात होणारे संशोधन आणि तंत्रज्ञानातील गुंतवणूक यामुळे या क्षेत्रातील उत्पादकतेला चालना दिली आहे.

२०२५ पर्यंत कृषी उत्पादनाचा जागतिक वाढीचा दर १.४ टक्के (अंदाजित) असून यात ८७ टक्के विकास हा तंत्रज्ञान सुधारणातून साध्य होणारा आहे. जी-१० देशांचा विचार केला तर या देशांत कृषीचे जीडीपीतील योगदान हे एक टक्क्यापेक्षा कमी आहे. इटलीत १.८६ टक्के आणि ङ्घान्समध्ये १.७४ टक्के योगदान पाहावयास मिळते. हे देश जमीन आणि मनुष्यबळाच्या आधारावर नाही तर आधुनिक तंत्रज्ञान आणि कुशल मानवी स्रोतांच्या बळावर उत्पादनात सातत्य राखून आहेत. त्याचवेळी भारत आणि ब्राझीलसारख्या मध्यम उत्पन्न गटातील देशांतील कृषी क्षेत्र अजूनही दहा ते वीस टक्क्यांपर्यंत जीडीपीत योगदान देतात आणि हळूहळू या आकड्यात घट होत आहे.

याउलट आफ्रिकी देश जसे सिएरा लिओन, इथोपिया, टांझानियात कृषी क्षेत्र हे जीडीपीत ३० ते ६० टक्क्यांपर्यंत योगदान देतात. परंतु हा विकास प्रामुख्याने नैसर्गिक स्रोतांचा अधिक वापरावर अवलंबून असून तो तंत्रज्ञान किंवा संशोधनावर आधारित नाही. परिणामी शाश्वत विकासाची शक्यता ही धूसर होत जाते. भारताला जागतिक स्तरावर महत्त्वाचा खेळाडू म्हणून नावारूपास यायचे असेल तर कृषी क्षेत्राला न डावलता त्यास औद्योगिकरणाला जोडावे लागेल.

कृषी आधारित उद्योग, खाद्य प्रक्रिया केंद्र, सेंद्रीय शेती, सौरऊर्जा आधारित सिंचन योजना, डिजिटल ॲग्रीकल्चर यासारख्या क्षेत्रात गुंतवणूक करावी लागेल. या पुढाकारातून केवळ ग्रामीण अर्थव्यवस्था सक्षम होणार नाही तर शहरातील औद्योगिक विकासाला नवी दिशा मिळेल. महिला आणि पुरुष या दोघांना या विकास यात्रेत समान संधी द्यायला हवी. त्याचवेळी सामाजिक संस्था, ग्राम पंचायत, स्थानिक प्रतिनिधींना विविध सरकारी योजनांच्या अंमलबजावणीत सक्रिय भूमिका बजावावी लागेल.

# बलुचिस्तान स्वतंत्र होणार?

बलुचिस्तान मुक्त होईल का, हे अनेक घटकांवर अवलंबून आहे- पाकिस्तानची अंतर्गत स्थिरता, आंतरराष्ट्रीय राजकारण, चीनचा हस्तक्षेप आणि स्थानिक जनतेचे दीर्घकालीन पाठबळ. पाकिस्तानमध्ये अंतर्गत हिंसाचाराचा आलेख वेगाने चढत आहे. २०२५ मध्ये १५ जुलैपर्यंत झालेल्या ५८० दहशतवादी हल्ल्यांमध्ये एकूण १,९६८ व्यक्तींना जीव गमवावा लागला. यामध्ये ३५१ सामान्य नागरिक, ६४१ पाकिस्तानी सुरक्षा दलांचे जवान आणि ९५६ बलुच स्वातंत्र्य लढवय्ये यांचा समावेश आहे. हे आकडे स्पष्ट दर्शवतात की पाकिस्तान आज विद्रोह, आणि राज्यविरोधी चळवळींच्या संकटात अडकला आहे.

९ ते ११ जुलैदरम्यान पार पडलेले 'ऑपरेशन बाम' हे पाकिस्तानच्या लष्कर आणि गुप्तचर संस्थांवर केलेले पूर्वनियोजित आक्रमण होते. ही कारवाई स्थानिक नेटवर्कच्या जोरावर अधिक प्रभावी झाली. बलुचिस्तान लिबरेशन फ्रंट (बीएलएफ)ने आपल्या संघर्षाच्या पद्धतीत महत्त्वपूर्ण बदल केला आहे. त्यांनी आता योजनाबद्ध आणि विशिष्ट उद्दिष्टे असलेल्या हल्ल्यांना सुरुवात केली आहे. त्यांची आक्रमक कारवाई ही पाकिस्तान सैन्य आणि गुप्तहेर संघटना आयएसआयच्या विरोधात होती.

हे बलुचिस्तानमधील पहिल्यांदा एकाच वेळी पूर्ण प्रांतव्यापी आक्रमण होते, ज्यामध्ये ८४ समन्वित हल्ले करण्यात आले. या मोहिमेत रणनीतीपूर्ण अचूकता, संघटित हल्ले आणि आक्रमणाची झलक दिसून आली. या मोहिमेत थेट हल्ले, सापळ्यात ओढून मारणे आणि ड्रोन पाडणे यांचा समावेश होता. या कारवाईत पाकिस्तानच्या सुरक्षा दलाचे ५० सैनिक ठार झाले तर अनेक जखमी झाले. विशेषतः मुसाखेलमधील लक्ष्यित हल्ल्यात ९ आयएसआयचे गुप्तचर अधिकारी ठार झाले. यामुळे पाकिस्तानच्या गुप्तचर यंत्रणेत मोठा हादरा बसला. बीएलएफने २२ ठिकाणी अडथळे निर्माण करत बलुचिस्तानमधे पाकिस्तान सैन्याची हरकत थांबवली.

मक्रान किनार्‍यापासून ते कोह-ए-सुलेमानच्या डोंगरांपर्यंत एकाच वेळी अनेक ठिकाणी हल्ले करण्यात आले. लष्करी छावण्या, आर्थिक मार्ग, गॅस वाहून नेणार्‍या वाहने आणि दूरसंचार टॉवर पाडणे यासारख्या कारवायांमधून बीएलएफच्या ताकदीची झलक दिसली. या मोहिमेत स्थानिक लोकांचा पाठिंबा दिसून आला. सशस्त्र लढवय्ये आधुनिक शस्त्रांनी सज्ज होते आणि स्थानिकांशी थेट संवाद साधत होते. याला प्रत्युत्तर म्हणून पाकिस्तान सरकारने अनेक अटकसत्रे आणि इंटरनेट सेवा बंदी केली, ज्यातून त्यांची भीती स्पष्ट झाली. अजून हे ऑपरेशन सुरू आहे. पाकिस्तान सैन्याने दावा केला आहे की त्यांनी २१ जुलैपर्यंत ९ बलुची दहशतवाद्यांना मारले आहे.

या मोहिमेनंतर बीएलएफ आता फक्त अधूनमधून होणार्‍या गुरिल्ला हल्ल्यांवर भर न देता, योजनाबद्ध आणि एकत्रित लष्करी कारवायांकडे वळत आहे.ऑपरेशन बाममुळे बलुचिस्तानमधील असंतोष अधिक संघटित आणि आक्रमक पद्धतीने समोर आला आहे. चीन-पाकिस्तान इकॉनॉमिक कॉरिडॉर (सीपीईसी) प्रकल्पांपैकी बहुतांश महत्त्वाचे रस्ते, बंदरे आणि ऊर्जा प्रकल्प बलुचिस्तानमध्ये आहेत- विशेषतः ग्वादार बंदर.

या प्रकल्पांवर सातत्याने होणार्‍या हल्ल्यांमुळे चीनची गुंतवणूक धोक्यात येते आणि सीपीईसीची व्यावहारिकता शून्य झाली आहे. चीन पाकिस्तानमध्ये फसला आहे. ग्वादार बंदरावर झालेल्या हल्ल्यांनी आणि गॅस व तेल वाहतूक रोखण्याच्या प्रयत्नांनी पाकिस्तानला आणि चीनचे आर्थिक व सामरिक नुकसान केले आहे व पाइपलाइन सुरक्षा धोक्यात आली आहे.चीनच्या दृष्टिकोनातून सीपीईसी हा 'इशश्रीं रपव ठेरव खपळींळरींळींश' चा मुख्य भाग आहे. त्यामुळे बलुच चळवळीमुळे निर्माण होणारी अस्थिरता चीनसाठीही अडथळा बनते.

ऑपरेशन बाममध्ये ८४ समन्वित हल्ले आणि ५० पेक्षा अधिक सैन्य बळीचे दावे हे पाकिस्तानच्या गुप्तचर यंत्रणा आणि लष्कराच्या अपयशाचे निदर्शक आहेत. गुप्तचर विभाग (आयएसआय)चे ९ अधिकारी मारले गेल्याने त्यांच्या ऑपरेशन क्षमतेवरील विश्वास डळमळीत झाला आहे. पाकिस्तान सध्या बलुच चळवळीविरोधात पारंपरिक आणि हायब्रिड वॉरफेअर वापरत आहे (जसे की माहिती युद्ध, मीडिया प्रोपगंडा, नागरिकांवर नियंत्रण). पण बीएलएफ सारख्या गटांनी आता ड्रोनचा वापर, समन्वित ब्लॉकेड्स, आणि गुप्तचर लक्ष्य करणे यामुळे तेसुद्धा हायब्रिड युद्ध लढत आहे.



ऑपरेशन बामनंतर बीएलएफ आणि इतर बंडखोर गट अधिक चांगले समन्वयाने कारवाया करतील. त्यांची पश्चिम बलुचिस्तान (इराणमध्ये) आणि अफगाण सीमेवर तेहरेके तालिबानशी जोडणारी युती निर्माण होत आहे. आता भारत, अमेरिका, युरोपियन देश आणि संयुक्त राष्ट्रसंघ या विषयात जास्त रस घेऊ शकतात, विशेषतः मानवाधिकारांच्या उल्लंघनाबद्दल. पाकिस्तानवर आंतरराष्ट्रीय दबाव वाढू शकतो. पंजाब, सिंध, पश्तून भागातही असंतोष आहे.

बलुचिस्तानमधील बंडखोरी यांना प्रेरणा देऊ शकते. आर्थिक संकट, महागाई व आयएमएफ दबावामुळे पाकिस्तान सरकार कमकुवत होत आहे. लोकल समर्थन वाढत आहे व ऑपरेशन बाममध्ये स्थानिक लोकांचा सहभाग आणि समर्थन दिसून आले. राजकीय दिशा स्पष्ट होत आहे. बीएलएफ आता केवळ बंडखोरी नाही, तर राजकीय संदेश देत आहे- स्वातंत्र्य, मानवाधिकार, संसाधनांवरील हक्क याबाबत. जर पाकिस्तानकडून अत्याचार, इंटरनेट बंदी आणि बेकायदेशीर अटक सुरूच राहिल्या, तर बलुच चळवळ आंतरराष्ट्रीय स्तरावर मान्यता मिळवू शकते.

अडथळे चीनचा विरोध : सीपीईसीमधील गुंतवणुकीमुळे चीन बलुचिस्तानच्या स्वातंत्र्यास विरोध करेल.

पाकिस्तान लष्कराची पकड : अजूनही बलुचिस्तानमध्ये लष्कराची मोठी उपस्थिती आहे. स्वातंत्र्य मिळवणे हे दीर्घकालीन संघर्षाचे रूप धारण करत आहे.

जागतिक दुहेरी धोरण : अनेक देश पाकिस्तानशी सैन्य व आर्थिक करारात गुंतलेले आहेत. त्यामुळे त्यांनी उघडपणे बलुच चळवळीला समर्थन देणे कठीण आहे.

पुढचा मार्ग बीएलएफने स्पष्ट केले आहे की ऑपरेशन बाम ही त्यांच्या लढ्याची केवळ सुरुवात आहे. यापुढे आणखी व्यापक आणि परिणामकारक कारवायांचे नियोजन सुरू आहे. त्यांच्या मते, जर पाकिस्तानचा सत्ताधारी वर्ग बलुचिस्तानच्या स्वातंत्र्याच्या हक्काकडे दुर्लक्ष करत राहिला, तर त्याचे गंभीर परिणाम भोगावे लागतील.

ऑपरेशन बाममुळे बलुच स्वातंत्र्य चळवळ एका निर्णायक टप्प्यावर पोहोचली आहे. यामुळे ५० टक्क्यांहून जास्त सैन्य आता पाकिस्तानच्या आतच दहशतवादी विरोधी अभियानात अडकले आहे. ही केवळ बंडखोरी नसून, ती एक संघटित, सामरिक, राजकीय चळवळ बनत आहे.

# केज शहरातील सिद्धार्थ नगर येथे भव्य नृत्य स्पर्धा संपन्न

केज/प्रतिनिधी केज शहरातील सिद्धार्थ नगर येथे लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांच्या जयंतीनिमित्त भव्य नृत्य स्पर्धा संपन्न झाल्या आहेत. कार्यक्रमाचे आयोजन कै. प्रमोद लांडगे प्रतिष्ठानच्या वतीने करण्यात आले होते. कार्यक्रमाचे उद्घाटक राष्ट्रवादी काँग्रेस अजितदादा पवार पक्षाचे ज्येष्ठ नेते हारुणभाई इनामदार, कार्यक्रमाचे अध्यक्षा म्हणून नगराध्यक्षा सौ. सीतताई बनसोडे तर प्रमुख पाहुणे म्हणून गोपाळ मस्के, युवा नेते लखन हजारे, राष्ट्रवादीचे सागर डिकोळे, दलित अन्याय अत्याचार निर्मूलन समितीचे अध्यक्ष रोहित कसबे, युवा नेते धीरज मस्के, वंचित चे प्रवीण मस्के, यांची प्रमुख उपस्थिती होती. सर्वप्रथम उपस्थित मान्यवरांच्या हस्ते महामानवांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून वंदन करण्यात आले. यावेळी जयंती उत्सव समितीच्या वतीने उपस्थित मान्यवरांचे शाल, पुष्पगुच्छ देऊन सन्मान करण्यात आला. लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांच्या जयंतीनिमित्त मागील चार ते पाच दिवसापासून दात नगर भीम नगर भागामध्ये विविध सांस्कृतिक उपक्रम घेऊन लोकशाहीर अण्णाभाऊ साठे



यांची जयंती मोठ्या उत्साह मध्ये साजरी करण्यात येत आहे. बुधवार रोजी कै. प्रमोद लांडगे प्रतिष्ठानच्या वतीने नृत्य स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. बालकलाकारांना आपली कला सादर करण्यात यावी व कलाकारांना हक्काचे व्यासपीठ मिळावे आणि त्याला करांच्या कलागुणांना दाद मिळावी या उद्देशाने कै. प्रमोद लांडगे प्रतिष्ठानच्या वतीने सुंदर प्रकारचे नियोजन केले होते. यावेळी कलाकारांनी प्रत्येक च्या माध्यमातून आपली कला सादर करून उपस्थितांची मनी जिंकली. या उपक्रमाचे सर्व स्तरातून कौतुक होत आहे. यावेळी कै. प्रमोद लांडगे प्रतिष्ठानचे पदाधिकारी व जयंती उत्सव समितीचे अध्यक्ष, उपाध्यक्ष,सचिव,सहसचिव कोषाध्यक्ष यासह पदाधिकारी आणि युवक–युती महिला, नागरिक, कलाकार मोठ्या संख्येने उपस्थित होते. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व प्रस्ताविक रोहित कसबे यांनी केले तर उपस्थितांचे आभार गोविंद लांडगे यांनी मानले.

# केज–कळंब रोडवर बस दुचाकी अपघातात एक ठार एक जखमी



केज/प्रतिनिधी शेगाव–पंढरपूर राष्ट्रीय महामार्गावर केज तालुक्यातील सुर्डी फाटा येथे बस दुचाकी यांच्यात झालेल्या अपघातात दुचाकीवरील एक जण जागीच ठार झाला तर एक जण जखमी झाल्याची घटना बुधवारी (दि३०) दुपारी एक वाजेच्या सुमारास घडली. गणेश बंकट अंबिरकर असे ठार झालेल्या व्यक्तीचे नाव आहे. याबाबत अधिक माहिती अशी, गणेश बंकट अंबिरकर राहणार डिकसळ ता कळंब (वय ४०) आणि अब्बास शेरखान पठाण (वय ६०) मूळ रहिवाशीला लाखा ता केज (ह. मु. इस्लामपुरा कळंब)हे दोघे कळंब येथून सुर्डी येथील एका कार्यक्रमानिमित्त दुचाकीवरून (चक २५ ३४ ६३) निघाले होते. सुर्डी फाट्याजवळ आल्यानंतर सुर्डी कडे जाणाऱ्या रस्त्याकडे दुचाकी वळवली त्याचवेळी मागून पुणेहुन वसमत (चक २० इङ ५८५०) कडे जाणारी एसटी बसचा दुचाकींला धक्का लागून दुचाकीवरील दोघे खाली पडले.आणि बसचे मागील चाक गणेश अंबिरकर यांच्या डोक्यावरून गेले त्यामुळे त्यांचा जागीच दुर्दैवी मृत्यू झाला.तर अब्बास शेरखान पठाण हे जखमी झाले आहेत. दरम्यान, अपघात होताच बस चालकाने बस युसुफवडगाव पोलीस ठाण्यात नेऊन लावली आणि अपघाताची माहिती दिली . युसुफवडगाव पोलीस ठाण्याचे स.पो.नी.मच्छिंद्रनाथ शेंडगे यांच्या मार्गदर्शनाखाली पो.ह.शेंडगे संपत व कोकाटे महेश यांनी अपघात स्थळाचा पंचनामा केला.त्यानंतर ॲम्ब्युलन्स ने गणेश अंबिरकर यांचा मृतदेह शवविच्छेदनासाठी कळंब येथील शासकीय रुग्णालयात पाठवून दिला. पुढील तपास पोलीस करत आहेत.

# डॉ. बाबासाहेब आंबेडकर लॉयर्स लीग,लातूरच्या वतीने प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश श्री. व्ही. व्ही. पाटील यांचा सत्कार

लातूर :– प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश श्री. व्ही. व्ही. पाटील यांचा निरोप समारंभ व सेवापूर्तीच्या निमित्ताने काल दिनांक ३०/०७/२०२५ रोजी सायंकाळी जिल्हा वकील मंडळ, लातूर यांच्या वतीने आयोजित कार्यक्रमात प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश श्री व्ही. व्ही. पाटील यांचा डॉ. बाबासाहेब आंबेडकर लॉयर्स लीग,लातूरच्या वतीने सत्कार करण्यात आला. यावेळी डॉ. बाबासाहेब आंबेडकर लॉयर्स लीगचे सदस्य तथा माजी जिल्हा सरकारी वकील ड.जांबूवंतराव सोनकवडे यांच्या हस्ते लेखक गोविंदराम शूरनर लिखित छत्रपती राजर्षी शाहू महाराज यांच्या जीवन कार्यावर प्रकाश टाकणाराराजर्षी शाहू महाराज हा ग्रंथ, शाल, पांडुरंगाची मूर्ती, बुके देऊन सन्मानपूर्वक यथोचित असा सत्कार करण्यात आला व त्यांचे पुढील उर्वरित आयुष्य हे सुख समाधानाचे,आरोग्यसंपन्न जावो यासाठी दीर्घायुष्याच्या लक्ष लक्ष सदिच्छा व्यक्त केल्या.यावेळी सत्कारप्रसंगी ड. शिवकुमार बनसोडे,ड.सचिन डी. कांबळे,ड. प्रशांत गायकवाड,ड. राम गजधने, विशेष सरकारी वकील ड. लक्ष्मण एन. शिंदे यांची उपस्थिती होती.




सदरील कार्यक्रमात मंचावर महाराष्ट्र अँड गोवा परिषदेचे सदस्य ज्येष्ठ विधिज्ञ ड.अण्णाराव पाटील, जिल्हा न्यायाधीश वर्ग १ मा.आर.भोसले साहेब, जिल्हा वकील मंडळाचे अध्यक्ष ड. योगेश जगताप, जिल्हा सरकारी वकील ड. संतोष देशपांडे,जिल्हा वकील मंडळाचे सचिव ड. गणेश गोजमगुंडे, उपाध्यक्ष ड.संजय जगदाळे, महिला उपाध्यक्ष ड. मनीषा दिवे पाटील, ग्रंथालय सचिव ड.प्रणव पी. रायचूरकर, सहसचिव ड.निलेश एस. मुचाटे, महिला सहसचिव ड.अभिलाषा यु गवारे कोषाध्यक्ष ड.गणेश कांबळे,ड हनुमंत वैजाळे, ड.लवकुमार तोष्णीवाल, ड.कोमल राठोड, ड.अन्वर चौधरी, ड.सोमेश्वर बिराजदार, ड.योगेश सिरसाट व लातूर जिल्हा वकील मंडळातील सर्व विधिज्ञ, न्यायलयीन कर्मचारी,पोलीस कर्मचारी,आदी मोठ्या संख्येने उपस्थित होते. या समारंभात सर्व वरिष्ठ व कनिष्ठ स्तर न्यायाधीश वृंद यांची प्रामुख्याने विशेष उपस्थिती होती.

# मालेगाव बॉम्बस्फोटाचा तपास करणाऱ्या झखचा खळबळजनक दावा; ’सरसंघचालक मोहन भागवतांना धरून आणा, असा मला आदेश होता’

मालेगाव बॉम्बस्फोटातील सात आरोपींची मुंबईतील विशेष एनआयए (राष्ट्रीय तपास संस्था) न्यायालयाने तब्बल १७ वर्षांनंतर पुराव्याअभावी निर्दोष मुक्तता केली आहे. त्यावर संमिश्र प्रतिक्रिया येत आहेत.

मालेगाव बॉम्बस्फोटाचा तपास करणाऱ्या त्यावेळी एटीएस पथकातील पोलिस निरीक्षक महिबूब मुजावर यांनी या प्रकरणावर मोठे भाष्य केले आहे. ’सरसंघचालक मोहन भागवत यांना पकडून आणण्याचे आदेश त्यावेळी मला देण्यात आले होते,’ असा खळबळजनक दावाही मुजावर यांनी केला आहे.



महिबूब मुजावर हे सध्या निवृत्त झाले असून त्यांनी यापूर्वीही मालेगाव बॉम्बस्फोटाच्या (Malegaon Bomb Blast ) तपासात अनेक चुका आहेत. अनेकांना त्यात गोवण्यात आले आहे, असे सांगून तसे पत्रही मुजावर यांनी कोर्टात दिले होते. त्याच मुजावर यांनी मालेगाव बॉम्बस्फोटातील आरोपींची निर्दोष मुक्तता करण्यात आल्यानंतर समाधान व्यक्त केले.

मुजावर म्हणाले, मालेगाव बॉम्बस्फोटाचा तपास खोटा आहे, त्यात लोकांना गोवण्यात आले आहे. रामजी कलसंग्रा, संदीप डांगे आणि दिलीप पाटीदार यांचा खून करण्यात आलेला आहे. तरीही त्यांचा तपास करण्याची जबाबदारी माझ्यावर सोपविण्यात आली होती. हे लोक जीवंत आहेत, हे दाखवण्यासाठी छापेमारीची कारवाई, ते मी केलं. पण माझ्या लक्षात आलं की, हे सर्व खोटं आहे आणि आपला त्यात वापर करण्यात येत आहे.

या तिघांच्या तपासाशिवाय मला एक गोपनीय आदेशही देण्यात आला होता. ’सरसंघचालक मोहन भागवत (Mohan Bhagwat) यांना धरून आणा’, असा आदेश मला देण्यात आला होता. अटक करून नव्हे तर धरून आणा, असा तो आदेश होता, ते बेकादा असल्यामुळे मी ते केले नाही. या सर्व प्रकरणाचा तपास झाला, सर्व घटना घडल्या. त्यावेळी त्यांच्या लक्षात आलं की, मला सर्व गोष्टी माहिती आहेत. त्यांना पाहिजे ते काम माझ्या हातून झाले नाही, त्यामुळे त्यांनी माझ्यावर खोटे गुन्हे दाखल करण्यात आले, असेही महिबूब मुजावर यांनी नमूद केले.

ते म्हणाले, फक्त गुन्हे दाखल करून थांबले नाही तर मला अटकही करण्यात आली. त्या प्रकरणात मी सात ते आठ वर्षे गुरफून राहिलो. पण त्या प्रकरणातून मी निर्दोष सुटलो. मी निर्दोष सुटल्यानंतर त्यात काही माझं म्हणणं होतं. सीआरपीसी ३१३ नुसार मी जबाब दिला. त्यामध्ये या खोट्या तपासाबाबत मी सांगितले. सर्व प्रकार मी कथन केला आहे. तीच कागदपत्रे यातील आरोपींना पुरविण्यात आली.

एसटीचे तत्कालीन प्रमुख परमवीर सिंग यांच्या मार्गदर्शनाखाली आणि त्यांनी दिलेल्या सूचनेनुसार मी हे काम करत होतो. दररोज मी त्यांना फीडबॅक देत होतो. न्यायालयाने आज दिलेल्या निकालाविषयी समाधान आहे. आजच्या जजमेंटमध्ये माझी भूमिका आली असेल तर माझ्याएवढा भाग्यवान कोणी नाही, असेही मुजावर यांनी स्पष्ट केले.

# फुलेनगर येथे बालाजी भाऊ गायकवाड यांचे व्याख्यान संपन्न तरुणांनी महामानवांना डोक्यावर घेण्यापेक्षा डोक्यात घ्यावे–, नगराध्यक्षा सौ.सीताताई बनसोड

केज/प्रतिनिधी लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांच्या जयंतीनिमित्त महात्मा फुले नगर,आंबेडकर, नगर, हाउसिंग कॉलनी येथील लहुजी वस्ताद साळवे चौक येथे बालाजी भाऊ गायकवाड यांचे व्याख्यान संपन्न झाले असून या कार्यक्रमात बोलताना नगराध्यक्षा सौ. सीताताई बनसोड म्हणाल्या की, तरुणांनी महामानवांना डोक्यावर न घेता डोक्यात घ्यावे तरच युवकांची प्रगती होईल असा तरुणांना बनसोडे यांनी मोलाचा संदेश दिला. लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांच्या जयंतीनिमित्त विविध सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन लहुजी प्रतिष्ठान, एलएफसी ग्रुप, सुमेध बप्पा शिंदे विचार मंच, महाराष्ट्र राज्य, यांच्या संयुक्त विद्यमाने करण्यात आले आहे. लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांची जयंती महात्मा फुले नगर, आंबेडकर नगर,हाउसिंग कॉलनी या भागामध्ये गेल्या अनेक वर्षापासून मोठ्या हर्षउलासाच्या वातावरणात विविध सांस्कृतिक उपक्रम घेऊन



साजरी केली जाते याचाच एक भाग म्हणून २०२५ व्या वर्षी लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांच्या जयंतीनिमित्त मागील तीन चार दिवसापासून या भागात विविध उपक्रम राबवले जात आहेत. दिनांक २९ जुलै २०२५ रोजी बालाजी भाऊ गायकवाड यांच्या व्याख्यानाच्या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. कार्यक्रमाचे प्रमुख मार्गदर्शन तथा व्याख्येते बालाजी भाऊ गायकवाड,या कार्यक्रमाचे उद्घाटक म्हणून नगराध्यक्षा सौ. सीताताई बनसोड यांची प्रमुख उपस्थिती होती, कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून डॉ. वैजनाथ सीरसागर तर कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे म्हणून, गटनेते राजूभाई इनामदार, नगरसेविका सौ.पद्मिनी अक्का शिंदे, ड. भागतराव ढाकणे, वंचितचे युवा नेते शरद धीवार, युवा नेते अमोल मिसाळ, मेजर लक्ष्मण थोरात, आकाश लोंढे सर, दलित अन्याय अत्याचार समितीचे अध्यक्ष रोहित कसबे, दत्ता लांडगे, उमेश घोडके यांची उपस्थिती होती. सर्वप्रथम उपस्थित मान्यवरांच्या हस्ते महामानवांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून वंदन करण्यात आले व मुख्य कार्यक्रमास सुरुवात करण्यात आली. यावेळी जयंती उत्सव समितीच्या वतीने उपस्थित मान्यवरांचे स्वागत करण्यात आले. यावेळी उपस्थित मान्यवरांनी मनोगत व्यक्त करून लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांच्या जीवन चरित्रावर सखोल असे मार्गदर्शन केले. यावेळी महात्मा फुले नगर, आंबेडकर नगर, हाउसिंग कॉलनी भागातील सामाजिक, राजकीय,शैक्षणिक क्षेत्रासह विविध क्षेत्रातील मान्यवर व युवक–युती, महिला, नागरिक आणि जयंती उत्सव समितीचे मार्गदर्शक, पदाधिकारी उपस्थित होते. या कार्यक्रम व प्रास्ताविक युवा नेते अशोक गायकवाड यांनी केले तर उपस्थितांचे आभार कुणाल यांनी मानले.

# आदित्य पाटील यांची भारतीय राष्ट्रीय काँग्रेसच्या महाराष्ट्र प्रदेश सरचिटणीस पदी निवड एक नेतृत्वशील वाटचाल



केज/प्रतिनिधी भारतीय राष्ट्रीय काँग्रेसच्या महाराष्ट्र प्रदेश समितीच्या सरचिटणीस पदावर आदित्य पाटील यांची नुकतीच नियुक्ती झाल्याची अधिकृत घोषणा करण्यात आली. ही निवड पक्षाच्या भविष्यासाठी एक सकारात्मक पाऊल असून तरुण नेतृत्वाला संधी देण्याच्या काँग्रेस पक्षाच्या धोरणाची ही ठळक निशाणी आहे.

आदित्य पाटील यांची राजकीय कारकीर्द आदित्य पाटील हे अत्यंत अभ्यासू, दूरदृष्टी असलेले आणि समाजाभिमुख नेतृत्व म्हणून ओळखले जातात. स्थानिक स्तरावरून सुरू झालेला हा प्रवास आता राज्यस्तरावर पोहोचलेला आहे. त्यांच्या नेतृत्वात युवक काँग्रेस, आणि जिल्हा कार्यकारिणीमध्ये विशेष कामगिरी केली आहे. ग्रामीण भागातील समस्या, शेतकऱ्यांचे हक्क, शिक्षण आणि रोजगार यांसारख्या मुद्द्यांवर त्यांचा ठाम आणि स्पष्टवक्ता दृष्टिकोन पक्षासाठी नेहमीच मार्गदर्शक ठरलेला आहे.

**काँग्रेस पक्षाची विश्वासू निवड**

महाराष्ट्रातील राजकारणात सध्या अस्थिरतेचे वारे आहेत. अशा परिस्थितीत आदित्य पाटील यांच्यासारख्या तरुण, ऊर्जावान आणि ध्येयवेड्या नेत्याला सरचिटणीसपदाची जबाबदारी देणे ही पक्षाच्या नवविचारांची आणि नवसंजीवनीची साक्ष आहे.

**भविष्यासाठी दिशा**

सरचिटणीस या पदावर काम करताना पक्ष संघटन बळकट करणे, युवकांना जोडणे, आगामी काळातील निवडणुकांसाठी रणनीती आखणे या मुख्य जबाबदाऱ्या आदित्य पाटील यांच्या खांद्यावर असतील. त्यांचा अनुभव, विचारशैली आणि लोकांशी असलेला थेट संवाद निश्चितच काँग्रेस पक्षाच्या पुनरुज्जीवनासाठी उपयुक्त ठरेल. निवडीबद्दल त्यांचे सर्वत्र अभिनंदन केले जात आहे.

# करीना कपूरनं दुसऱ्या प्रेग्नन्सीनंतर २५ किलो वजन कसं कमी केलं? ना डाएट, ना फास्टिंग फॉलो केली फक्त ‘ही’ ट्रिक

बॉलीवूड अभिनेत्री करीना कपूर नेहमीच तिच्या सुंदर लूकसह फिटनेसमुळे चर्चेत असते. अलीकडेच आहारतज्ज्ञ रुजुता दिवेकर यांच्या पुस्तक प्रकाशन कार्यक्रमात करीनानं हजेरी लावली हती. या कार्यक्रमात बोलताना करीनानं तिच्या दुसऱ्या मुलाच्या म्हणजे जहांगीरच्या जन्मानंतर तिचं वजन २५ किलो वाढल्याचं सांगितलं. यावेळी तिनं पुन्हा पहिल्यासारखं वजन नियंत्रणात ठेवण्यासाठी काय केलं याविषयीही सांगितलं.

करीना सांगते की, मी स्वत:लाच एक गोष्ट सांगत राहिली की, मी अजूनही छान दिसते. जेहच्या जन्मानंतर एक क्षण असा आला, जेव्हा मला वाटले की, अरे देवा, मला आता परत वजन कमी करण्यासाठी सगळ्या गोष्टी कराव्या लागतील; पण ते सर्व क्षणभरासाठी होतं. मी स्वत: माझं २५ किलो वजन वाढलं हे लक्षात येऊ दिलं नाही आणि सांगत राहिले की, मी अजूनही सुंदर दिसते.

त्यातून करीनानं स्वत:वर प्रेम करीत आपला आत्मविश्वास कसा टिकवून ठेवला हे स्पष्ट केलं. जब वी मेट या चित्रपटातील एक प्रसिद्ध डायलॉग तिनं सांगितला. ती म्हणाली की, मी अशी व्यक्ती आहे, जी प्रत्यक्षात मैं अपनी फेवरेट हूँ या नियमाचे पालन करते. आत्मविश्वास हा प्रत्येक स्त्रीसाठी जीवन जगण्याचा एकमेव मार्ग आहे.

तिनं पुढे म्हटलं की, तिनं कधीही स्ट्रिक डाएट प्लॅन फॉलो केला नाही किंवा वजन कमी करण्यासाठी कधी ती उपाशी राहिले नाही. ती सांगते, अन्नाशी माझं अद्भुत नातं राहिलं आहे. म्हणून मला वाटतं की त्यामुळे मला खरोखर मदत झाली आहे. मी कधीही बारीक दिसण्यासाठी उपाशी राहण्याचा प्रयत्न केला नाही की, मी माझ्या स्वतःच्या त्वचेला घेऊन खूप कम्फर्टेबल होते.

गर्भधारणेनंतर बऱ्याच महिलांना वजन कमी करताना त्यांनी काय केले पाहिजे?

मानसशास्त्रज्ञ अंजली गुरसहाने यांनी इंडियन एक्स्प्रेसशी बोलताना सांगितले की, आपण कसे दिसतो यापेक्षा आपलं शरीर काय करू शकते यावर लक्ष केंद्रित करून सुरुवात करा. स्वतः ला प्रश्न विचारा, ‘माझं शरीर आज माझ्यासाठी काय करू शकते?’ आणि फक्त आकारच नाही तर ऊर्जा, ताकद आणि गतिशीलता यासारख्या गोष्टींची जाणीव होऊ द्या. तुम्हाला शरीरात नेमके कोणते बदल करायचेत हे ठरवा.

गर्भधारणेपूर्वी तुमचे शरीर कसे होते, तसेच शरीर पुन्हा मिळवण्यासाठी प्रयत्न करण्याऐवजी इतर अर्थपूर्ण बदलांचा जरा विचार करा. जसे की, चांगली झोप, ताकद वाढविण्यासाठी प्रयत्न करा, कमी इच्छा आणि सुधारित भावनिक नियमन साधा.



चांगली मानसिकता राखण्यासाठी सोशल मीडिया फीड क्युरेट करा – ‘बाउन्स बॅक’ संस्कृतीला प्रोत्साहन देणारे अकाउंट्स अनफॉलो करा आणि प्रसूतीनंतरचा अनुभव प्रामाणिकपणे आणि चांगल्या प्रकारे शेअर करणाऱ्या क्रिएटर्सना फॉलो करा. सर्वांत महत्त्वाची बाब म्हणजे स्वतःशी खूप नम्रपणे बोला.

गुरसहाने सुचवतात की, खाताना चांगले विरुद्ध वाईट, असं लेबल लावणं सोडून द्या. कारण– अन्नाला कोणत्याही लेबलची गरज नसते. चिप्स वाईट नसतात आणि सॅलड खूप पौष्टिक असतात, असं नाही. अन्नाला शरीरासाठी इंधन, आराम व उत्सव म्हणून काम करू द्या. तुम्हाला भूक लागल्यानंतर काय खायला आवडतं ते ओळखा आणि त्यानुसार खाण्याचा प्रयत्न करा.

हे खावे, ते खाऊ नये, असे करण्याऐवजी नियमित पोषणावर लक्ष केंद्रित करा. उपाशी राहिल्याने अनेकदा थकवा येतो. म्हणून नियमितपणे खात जा. वजन वाढतंय म्हणून शरीराची आबाळ होऊ देऊ नका. तुम्हाला खाण्याची एक साधी पद्धत खूप फायदेशीर ठरू शकते. जसे की, प्रथिने आणि फायबरयुक्त पदार्थांचा नाश्त्यात समावेश करा. दुपारच्या जेवणात कार्ब्स, भाज्या व लीन फॅट्सयुक्त पदार्थ खा. तसेच न लाजता संध्याकाळी नाश्ता करा.

सर्वांत महत्त्वाची बाब म्हणजे नियंत्रणाऐवजी आहारात संतुलन राखा, विशेषतः जर तुम्ही पालक असाल, तर तुमच्या आणि तुमच्या पाल्याच्या आरोग्याच्या दृष्टीने संतुलित आहार घेणं गरजेचं आहे.

# महसूल सप्ताहानिमित्त १ ते ७ ऑगस्ट दरम्यान लातूर जिल्ह्यात विविध लोकोपयोगी उपक्रमांचे आयोजन

लातूर :- महसूल दिनानिमित्त महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्या संकल्पनेतून १ ते ७ ऑगस्ट २०२५ या कालावधीत महसूल विभागामार्फत महसूल सप्ताह साजरा केला जाणार आहे. महसूल व वन विभागाच्या २९ जुलै २०२५ रोजीच्या शासन निर्णयानुसार, या सप्ताहात विविध लोकोपयोगी उपक्रमांचे आयोजन करण्यात येणार असल्याची माहिती जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर-घुगे यांनी दिली. या माध्यमातून महसूल विभागाच्या योजना आणि कार्याची माहिती जनतेपर्यंत पोहोचविण्याचा उद्देश आहे, असे त्यांनी सांगितले. नागरिकांचे जीवन सुखकर आणि प्रशासकीय प्रक्रिया सुलभ करण्यासाठी महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्या मार्गदर्शनाखाली गेल्या सहा ते सात महिन्यांत महसूल विभागाने अनेक महत्त्वपूर्ण निर्णय घेतले आहेत. यामध्ये नवीन वाळू धोरण २०२५ लागू करून स्थानिक गृहनिर्माण लाभार्थ्यांना प्रत्येकी ५ ब्रास वाळू मोफत उपलब्ध करणे, महाखनिज पोर्टलद्वारे पारदर्शक वाहतूक परवाने, तसेच पर्यावरणपूरक एम- सँड उत्पादनाला प्रोत्साहन देण्याचा समावेश आहे. तसेच, जिवंत सातबारा मोहिमेला गती देण्यासाठी विशेष शिबिरांचे आयोजन करण्यात आले. या शिबिरांमधून प्रलंबित फेरफार नोंदी पूर्ण करणे, सातबारा वाटप आणि ग्रीस्टॅक योजने अंतर्गत शेतकऱ्यांची नोंदणी करून फार्मर आयडी वाटप करण्यात आले. सलोखा योजने अंतर्गत कौटुंबिक मालमत्तेच्या वाटपासाठी दस्तनोंदणीवरील मुद्रांक शुल्क माफीचा महत्त्वपूर्ण निर्णय घेण्यात आला, ज्यामुळे कौटुंबिक वादांचे निराकरण सुलभ झाले. याशिवाय, छत्रपती शिवाजी महाराज महसूल अभियान प्रत्येक वर्षी सर्व महसूल मंडळांमध्ये चार वेळा राबविण्याचा निर्णय घेण्यात आला. या अभियानांतर्गत ग्रामीण भागातील नागरिक, शेतकरी, विद्यार्थी आणि महिलांच्या महसूलविषयक समस्यांचे निराकरण करण्यासाठी मंडळ स्तरावर समाधान शिबिरे आयोजित केली जातात. महसूल विभागाच्या योजनांचा लाभ आणि माहिती जास्तीत जास्त नागरिकांपर्यंत पोहोचविण्यासाठी यंदा १ ते ७ ऑगस्ट २०२५ दरम्यान महसूल सप्ताह राबविला जाणार आहे. सर्व उपविभागीय अधिकारी स्तरावर १ ऑगस्ट २०२५ रोजी सकाळी ११:११ वाजता महसूल दिन साजरा करून या सप्ताहाचा शुभारंभ होईल. यावेळी महसूल संवर्गातील कार्यरत व सेवानिवृत्त अधिकारी-कर्मचाऱ्यांशी संवाद, उत्कृष्ट कर्मचारी पुरस्कार वितरण आणि लाभार्थ्यांना विविध प्रमाणपत्रांचे वाटप होईल. २ ऑगस्ट रोजी सन २०११ पूर्वीपासून शासकीय जागेवर अतिक्रमण करून राहणाऱ्या पात्र कुटुंबांना अतिक्रमित जागांचे पट्टे वाटप करण्याची कार्यवाही होईल. ३ ऑगस्ट रोजी पाणंद आणि शिवार रस्त्यांची मोजणी करून त्यांच्या दुतर्फा वृक्षारोपणाचा उपक्रम राबविला जाईल. ४ ऑगस्ट रोजी नागरिकांच्या तक्रारींचे निराकरण करण्यासाठी छत्रपती शिवाजी महाराज महसूल अभियान प्रत्येक मंडळानिहाय राबवले जाईल. ५ ऑगस्ट रोजी विशेष सहाय्य योजने अंतर्गत डीबीटी न झालेल्या लाभार्थ्यांना घरभेटी देऊन अनुदान वाटप केले जाईल. ६ ऑगस्ट रोजी शासकीय जमिनीवरील अतिक्रमणे हटवून त्या अतिक्रमणमुक्त करण्याबरोबरच शर्तभंग झालेल्या जमिनींबाबत नियमानुसार निर्णय घेतले जातील. ७ ऑगस्ट रोजी च-डरपव धोरणाची अंमलबजावणी आणि नवीन मानक कार्यप्रणाली (डजझ) चा पूर्वाभ्यास घेतला जाईल, तसेच महसूल सप्ताहाचा समारोप होईल. नागरिकांनी या उपक्रमांत जास्तीत जास्त संख्येने सहभागी होऊन महसूल विभागाच्या सेवांचा लाभ घ्यावा, असे आवाहन जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर-घुगे यांनी केले आहे.

## मोहम्मद रफी यांच्या स्मृतीदिनी अभिवादन..! मोहम्मद रफी यांना भारतरत्न देण्याची मागणी

अहमदपूर :- महान गायक स्वरसम्राट पद्मश्री मोहम्मद रफी यांच्या सृतीदिनाच्या निमित्ताने शहरातील मोहम्मद रफी मार्गाच्या नामफलकास पुष्पहार अर्पण करून साहित्य संगीत कला अकादमीच्या वतीने सामूहिक अभिवादन करण्यात आले. या प्रसंगी जेष्ठ नेते दिलीपराव देशमुख यांनी आपले मनोगत व्यक्त करताना मोहम्मद रफी सारखा अष्टपैलू गायक भविष्यात होणार नाही. त्यांनी आपल्या गायनाच्या माध्यमातून राष्ट्रीय एकात्मता वृध्दींगत करण्याचा प्रयत्न केला अशी भावना व्यक्त केली. तर कार्यक्रमाचे संयोजक तथा अकादमीचे अध्यक्ष युवकनेते डॉ.सिध्दार्थकुमार सूर्यवंशी यांनी मोहम्मद रफी यांनी आपल्या गीतांच्या माध्यमातून प्रेम,शांती, राष्ट्रभक्ती वध्दींगत करण्याचा संदेश दिला आहे.रफीं सारख्या महान गायकाचा आणी त्यांच्या कलेचा सन्मान करण्यासाठी भारतरत्न हा सर्वोच्च नागरी पुरस्कार देवून त्यांचा गौरव करणे गरजेचे आहे.या मागणीचा सर्व कला प्रेमींनी पाठपूरावा करावा असे अवाहन त्यांनी केले. या छोटेखानी अभिवादन कार्यक्रमाचे अध्यक्ष आंबेडकरीचळवळीतीलजेष्ठनेतेगोपीनाथरावजोंधळे होते तर या प्रसंगी शेख रहीमभाई शेखूभाई,माजी नगराध्यक्षा सरस्वतीबाई कांबळे,शेख चांद सौदागर,डॉ.बालाजी थिट्टे,संतोषराव गायकवाड, शेख मोहम्मद,पांडूरंग कांबळे,सिध्दार्थ वाघमारे, शेख गौस,पठाण सलमान, शेख आजीम,बालाजी संमूखराव,गफ्फारभाई पठाण,सामाजिक कार्यकर्ते अण्णाराव सूर्यवंशी,सिध्दार्थ गायकवाड, शंकर नावंदे, संविधान कदम, आकाश वाघमारे, संतोष सोनकांबळे,अभय गुळवे, प्रथमेश सोनकांबळे, राहुल वाघमारे,सुमित कांबळे,शरद बनसोडे,पत्रकार अजय भालेराव,सचिन बानाटे आदींची प्रमुख उपस्थिती होती.



## एकुरगा येथील जिल्हा परिषद शाळेची तुकडी वाढ रद्द करण्यात यावी : रामेश्वर सूर्यवंशी, अण्णा हजारे प्रणित राष्ट्रीय लोक आंदोलन न्यास, जिल्हा सचिव

लातूर : लातूर तालुक्यातील एकुरगा येथील जिल्हा परिषद शाळेला शासनाच्या तुकडी बंदी कायद्याचे उल्लंघन करून इयत्ता आठवीची तुकडी वाढवून देण्यात आली आहे. ही तुकडीवाढ तात्काळ रद्द करण्यात यावी, अशी मागणी राष्ट्रीय लोक आंदोलन न्यासचे लातूर जिल्हा सचिव रामेश्वर सूर्यवंशी यांनी गुरुवारी लातुरात पत्रकार परिषदेत बोलताना केली. लातूर जिल्ह्यातील जिल्हा परिषदेच्या जवळपास २५ टक्के शाळांमध्ये सध्यस्थितीत भौतिक सुविधांचा अभाव आहे. अशा परिस्थितीत लातूर जिल्हा परिषद केंद्रीय शाळा तुकडी प्रशासनाकडून ग्रामस्थ आणि पालकांची मागणी येताच जिल्हा परिषद शाळांना वाढीव तुकड्यांना मंजुरी देण्यात येऊ नयेत, असे निर्देश असतानाही त्या शासन निर्णयाकडे कानाडोळा करून आठवीच्या वर्गाला मान्यता देण्यात येत असल्याचा प्रकार उघडकीस आला आहे, असे रामेश्वर सूर्यवंशी यांनी यावेळी सांगितले. एकुरगा गावातील जिल्हा परिषदेची तुकडी वाढ देण्यात आलेली शाळा आणि छत्रपती शाहू विद्यालय या दोन शाळांमधील अंतरही केवळ ५०० मीटरच्या आत आहे. नियमानुसार तुकडी वाढीचा हा निर्णय अनुचित आहे. विशेष म्हणजे जिल्हा परिषदेच्या तुकडीवाढ देण्यात आलेल्या या शाळेत आठवीच्या विद्यार्थ्यांची संख्या केवळ २० आहे. तर गावातील खाजगी शिक्षण संस्थेअंतर्गत चालविण्यात येणाऱ्या छत्रपती शाहू विद्यालयात ३० विद्यार्थी आठवीचे शिक्षण घेत आहेत. या विद्यालयाच्या व विद्यार्थ्यांच्या प्रतिष्ठेवर गदा आणण्याच्या उद्देशाने ही तुकडी वाढ देण्यात आली आहे, असा आरोपही त्यांनी यावेळी केला. जिल्हा परिषद शाळांमध्ये शिकणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी अनेक योजना आहेत. मात्र त्या जिल्हा परिषद प्रशासनाकडून व्यवस्थितरीत्या राबविल्या जात नसल्याचा आरोप सूर्यवंशी यांनी केला. तर जिल्ह्यातील जिल्हा परिषद शाळेतील विद्यार्थी पुढील शिक्षणासाठी तुकडीचा वाट पाहत आहेत. गावात चौथी पर्यंत शाळा आहेत त्या ठिकाणी विद्यार्थ्यांना पुढील शिक्षणासाठी पाच पाच किलोमीटर पायपीट करण्याची वेळ येत आहे. अशा शाळांकडे प्रशासनाचे दुर्लक्ष होताना दिसत आहे. विद्यार्थ्यांना इजा होऊ नये म्हणून पॉलिस्टर कपड्याचा गणवेश घेतले जावूनयेत, असे निर्देश असतानाही पॉलिस्टरचेच गणवेश घेतले जातात. या विद्यार्थ्यांना शूज, सॉक्स साठीही शासन अर्थसहाय्य करते. मात्र त्यांना कधीही शूज - सॉक्स वितरित केले जात नाहीत. या बाबींवर लक्ष केंद्रित करण्याऐवजी जिल्हा परिषद प्रशासन तुकडी वाढीसारख्या नियमबाह्य कामांना प्राधान्य देत असल्याबद्दल तीव्र शब्दात नाराजी व्यक्त करून सूर्यवंशी यांनी ही तुकडी वाढ रद्द करण्याची मागणी केली आहे. याप्रसंगी अण्णा हजारे प्रणित राष्ट्रीय लोक आंदोलन न्यास जिल्हा सचिव रामेश्वर सूर्यवंशी, अस्लम शेख राष्ट्रीय लोक आंदोलन न्यास तालुका अध्यक्ष, सोनेराव गायकवाड राष्ट्रीय लोक आंदोलन न्यास तालुका सचिव लातूर आदी मान्यवर उपस्थित होते.



## कायद्याच्या चौकटीत राहून सण-उत्सवाचा आनंद घ्याबिलोली येथील शांतता कमिटी बैठकीमध्ये - उपविभागीय पोलीस अधिकारी शाम पानेगावकर यांचे आवाहन

बिलोली -कमलाकर जमदडे :- ऑगस्ट महिन्यात येणाऱ्या श्रावण महिना, लोकशाहीर अण्णाभाऊ साठे जयंती, गोपाळकाला आणि पोळा यांसारख्या सण-उत्सवांच्या पार्श्वभूमीवर पोलीस स्टेशन बिलोली यांच्या वतीने शांतता समितीची बैठक पंचायत समिती सभागृहात आयोजित करण्यात आली होती. या बैठकीत सण-उत्सव साजरे करताना कायद्याच्या चौकटीत राहून कुणाच्याही भावना दुखावणार नाहीत याची खबरदारी घ्यावी, असे आवाहन उपविभागीय पोलीस अधिकारी शाम पानेगावकर यांनी केले. त्यांनी पुढे सांगितले की, सामाजिक सलोखा जपणे, शांततेत उत्सव पार पाडणे हे सर्वांचेच कर्तव्य आहे. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी उपविभागीय अधिकारी क्रांती डोंबे होत्या. पोलीस निरीक्षक अतुल भोसले यांनी प्रास्ताविकात सांगितले की, बिलोली तालुका हा शांतताप्रिय आहे व नागरिकांनी प्रत्येक वेळी पोलिसांना सहकार्य केले आहे. तसेच, उत्सव काळात जयंती मंडळांनी घ्यावयाची काळजी, वेळेचे भान, डिजेचा वापर, कायद्यानुसार परवानग्या यासंदर्भात सूचना दिल्या. अध्यक्षीय भाषणात क्रांती डोंबे यांनी स्पष्ट शब्दांत सांगितले की, शांततेस बाधा ठरणाऱ्या व्यक्तींविरोधात प्रशासन कुठलीही गय करणार नाही. त्यांनी हिप्परगा थडी येथील डिजेमुक्त व शांततेत साजरी झालेली जयंती याचा आदर्श घेण्याचे आवाहन केले. या बैठकीस विजवितरण उपअभियंता पाटील, वैद्यकीय अधीक्षक डॉ. पांडुरंग पावडे, नायब तहसीलदार संजय परळीकर, नगरपालिकेचे प्रतिनिधी कदम, पोलीस पाटील, सरपंच, नगरसेवक, पत्रकार, होमगार्ड, जयंती मंडळांचे पदाधिकारी आणि सामाजिक कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन मुकिंदर कुडके यांनी केले.






## अल्पवयातच उत्कृष्ट निवेदिका म्हणून उदयास आलेली कु. पारमी पवार हिच्या निवेदन कौशल्याने साऱ्यांचे लक्ष वेधले

गुहागर :- गुहागर तालुक्यातील तळवली या गावची सुकन्या कु. पारमी दीपाली रविंद्र पवार ही अल्पवयातच उल्लेखनीय निवेदिका म्हणून नावारूपास आली आहे. सध्या इयत्ता ८वीत शिक्षण घेणाऱ्या पारमीने नुकत्याच मुंबई येथे पार पडलेल्या भीमा तुम्हा वंदना या कार्यक्रमात अतिशय मधाळवाणीने प्रभावी, सुवाच्य निवेदन सादर करून रसिकांची मने जिंकली, तिच्या या सादरीकरणाचे सर्वत्र कौतुक होत असून तिच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे. कु. पारमी हिने तिच्या निवेदनकलेचे संपूर्ण श्रेय तिच्या वडिलांना म्हणजे रविंद्र पवार यांना दिले. पारमीचे वडील रविंद्र पवार यांनी २००० ते २००२ या कालावधीत गुहागर व चिपळूण परिसरातील शाळा, महाविद्यालये व सेवाभावी संस्थांमध्ये स्मरणशक्ती विकास व व्यक्तिमत्त्व विकास यासारख्या विषयांवर तब्बल ८० विनामूल्य व्याख्याने दिली होती. सध्या ते झी टीव्हीवरील 'शिवा' मालिकेचे निर्मितीप्रबंधक म्हणून काम पाहत आहेत. कु. पारमीने वयाच्या चौथ्या वर्षापासूनच तिच्या प्राथमिक शाळेतील कार्यक्रमांतून निवेदिका म्हणून निवेदन करण्यास सुरुवात केली. पुढे जाऊन हसत खेळत प्रबोधन करूया व आपणच होम मिनिस्टर होऊया यांसारख्या महिलांसाठी आयोजित कार्यक्रमांमध्येही तीने निवेदिका म्हणून सहभाग घेतला असून तिचे निवेदनकौशल्य दिवसेंदिवस प्रगल्भ होत आहे. येणाऱ्या २० ऑगस्ट २०२५ रोजी शिवाजी मंदिर, दादर येथे सायंकाळी ७ वाजता सृष्टी फाउंडेशनतर्फे आयोजित हिंदी-मराठी गाण्याच्या कार्यक्रमात पारमी निवेदिका म्हणून पुन्हा एकदा आपली चमक दाखवणार आहे. कु. पारमी पवार ही जरी बालवयात असली तरी तिच्या भाषिक अभिव्यक्ती, आत्मविश्वास आणि निवेदनशैलीमुळे ती एक उदयोन्मुख सूत्रसंचालिका म्हणून निश्चितच आश्वासक वाटते. तिच्या पुढील वाटचालीसाठी तळवली ग्रामस्थ, नातेवाईक, तिचे शिक्षकवृंद व अनेक मान्यवरांनी तिला शुभेच्छा देत तिच्यावर शुभेच्छांचा वर्षाव केला आहे.



## साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे जयंती निमित्त राष्ट्र सेवा दलाच्या वतीने शुक्रवारी लातुरात भव्य प्रबोधन रॅली

लातूर : साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे यांच्या १०५ वी जयंती निमित्त राष्ट्र सेवा दल लातूर जिल्ह्याच्या वतीने साजरी करण्यात येत आहे. लातूर शहरातील डॉ. बाबासाहेब आंबेडकर पार्क येथून १ऑगस्ट रोजी सकाळी ८.३० वाजता प्रबोधन रॅली काढण्यात येणार असून महात्मा गांधी चौक, मध्यवर्ती बस्थानक, गंजगोलाई या मार्गांवरून जाऊन साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे येथे पोहचणार आहे. तिथे साहीत्यरत्न अण्णाभाऊ साठे यांच्या पुतळ्यास अभिवादन करून रॅलीचा समारोप होणार आहे. तरी या रॅलीत राष्ट्र सेवा दल व समविचारी संघटनाच्या कार्यकर्ते, पदाधिकाऱ्यांनी मोठ्या संख्येने सहभागी व्हावे, असे आवाहन राष्ट्र सेवा दलाचे लातूर जिल्हाध्यक्ष पांडुरंग देडे, विजय चव्हाण, प्रतापराव माने, माजी पूर्णवेळ कार्यकर्ते शिवाजी कांबळे, ॲड. प्रदीप पाटील हरिदास तमेवार अंकुश गायकवाड, ज्येष्ठ पत्रकार जयप्रकाश दगडे, ॲड.शेखरहविले, शिवाजीराव नरहरे, ज्येष्ठ विचारवंत प्रा. नागोराव कुंभार प्रा. सुभाष भिंगे नरसिंग घोडके प्रा. सोमनाथ रोडे डॉ. गणेश गोमारे, उत्तरेश्वर बिराजदार, प्रेमाताई देडे, रामकुमार रायवाडीकर, अनुराधा कांबळे, अनार्य कांबळे आदी राष्ट्र सेवा दल सैनिकांनी केले आहे.



## मालमत्ताकर सूट/सवलतीस ८ ऑगस्ट पर्यंत मुतदवाढ कर भरून सवलतींचा लाभ घ्यावा - आयुक्त मानसी मीना

लातूर/प्रतिनिधी :- लातूर शहर महानगरपालिका,हद्दीतील मालमत्ताधारकांस कळविण्यात येते की, सन २०२५-२६ ची मालमत्ता कर सूट योजना सुरू आहे. सदरील आर्थिक वर्षात नियमितपणे व सुरुवातीस कर भरणारे मालमत्ता धारकाना प्रोत्साहन देणे साठी विविध सुट/सवलती देण्यात आले आहेत. त्यानुसार ३१ जुलै पर्यंत मालमत्ता कर भरणाऱ्यास ५% सूट तर `पश्रळपश भरणा-केल्यास ५ % अतिरिक्त सूट सवलत देण्यात आली होती. माहे जुलै अखेर जवळपास १० हजार हून अधिक नागरिकांनी २६ लाख येवढ्या रकमेचा सूट लाभ घेत ८.५ कोटी टॅक्स भरला असून एकूण ८.५ कोटी टॅक्स वसुली मनपाच्या कर संकलन विभागामार्फत झाली आहे. सदर योजनेस मालमत्ताधारकांचा मिळणारा उस्फुर्त प्रतिसाद, कर भरणा केंद्रावर होणारी गर्दी व मागणी पहाता योजनेस मुदतवाढ देण्याचा निर्णय मनपा आयुक्त तथा प्रशासक श्रीमती मानसी यांनी घेतला आहे. त्यादृष्टीने टॅक्स सूट/सवलतीस ८ ऑगस्ट २०२५ पर्यंत मुदतवाढ देण्यात येत आहे. तरी उर्वरीत मालमत्ताधारकांनी देण्यात आलेल्या मुदतवाढचा व सवलतीचा लाभ घेवुन आपल्याकडील देय असलेल्या मालमत्ताकराचा व पाणीपट्टीकराचा भरणा करुन मनपास सहकार्य करावे व मनपाचे नियमित करदाते व्हावे असे आहवान आयुक्त मानसी यांनी केले आहे. कर भरणा करण्यासाठी mclatur.org, LaturProperty Tax सिटीझन ॲप किंवा propertytax.mclatur.in या वेबसाईटचा वापर करावा व आपल्याकडील देय कराचा भरणा करून वरील देण्यात आलेल्या सवलतीचा लाभ घेण्यात यावा.



## आ. रमेशआप्पा कराड यांच्याकडून चिकलठाणा येथील जाधव परिवाराचे सांत्वन

लातूर :- राज्याचे सहकार मंत्री ना. बाबासाहेब पाटील यांचे मेहूणे लातूर तालुक्यातील मौजे चिकलठाणा येथील बाळासाहेब जाधव यांच्या पत्नी प्रभावती बाळासाहेब जाधव यांचे नुकतेच अल्पशा आजाराने निधन झाले. या घटनेची माहिती मिळाल्याने भाजपा नेते तथा लातूर ग्रामीणचे आमदार श्री. रमेशआप्पा कराड यांनी चिकलठाणा येथे बाळासाहेब जाधव यांच्या निवासस्थानी भेट देऊन जाधव कुटुंबियांचे सांत्वन केले.

यावेळी जाधव कुटुंबातील बाळासाहेब जाधव, हेमंत जाधव, सूर्यकांत जाधव, रमेश जाधव, दत्ता जाधव, गोपाळ पाटील, माणिक देशमुख व इतर अनेक जण होते याप्रसंगी आ. कराड यांच्या समवेत भाजपा किसान मोर्चाचे विक्रमकाका शिंदे, प्रदीप पाटील खंडापूरकर, भागवत सोट, सतीश आंबेकर, मंडल अध्यक्ष प्रताप पाटील, सुरज शिंदे, विजय मलवाडे, पांडुरंग बालवाड, बाबासाहेब इंगळे, आदिनाथ मुळे, राम बंडापल्ले, संजय ठाकूर, रुपेश काळे, व्यंकटराव जटाळ, मारुती शिंदे, लिंबराज बोळंगे, बालाजी भरवडे, गुणवंत तेलंगे, वसंत चेरे यांच्यासह अनेक जण होते.



PRINTED BY MAHESH MOTIRAM RATHOD, OWNED, PUBLISHED & EDITED BY ASHOK NAMDEVRAO HANWATE, PRINTED AT MAYUR PRINTERS, PLOT No. B-28, MIDC, NEAR BUS STAND 03, LATUR, Tq. & DIST. LATUR - 413512 (M.S.) PULISHED AT : KHADAK HANUMAN, MILIND NAGAR, LATUR TQ. & DIST. LATUR - 413512 (M.S.) EDITOR : ASHOK NAMDEVRAO HANWATE